माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३०५०**

**अपिलार्थी श्री. मेर्विन रिचर्ड वेगास**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)**
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
फोर्ट, मुंबई - ४००००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे)**
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटजवळ,
फोर्ट, मुंबई - ४००००१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०७.२०२४ | १६.०८.२०२४ | २६.०८.२०२४ | २५.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.१०.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १६.०८.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २५.०९.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १२.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- "Give the record alongwith all papers of the file noting, Application filed for Grand of Sanction against: (1) Mr. Pravin Kumar Padwal, then Jt. Commissioner of Police, EOW, then Traffic Headquarters, Now at Special IGP (Training), (2) Dr. Maheshwar Reddy, the DCP Zone-10, now at present at Headquater 1 (3) Mr. Sunil Gaonkar. then ACP Andheri Division, now at present Railway Byculla (4) Mr. Santaji Raghunathrao Ghorpade, Sr PI., Andheri Police Staion, (5) Mr. Talekar, then Police Inspector, Andheri Police Station, now at Kherwadi Police Station, (6) Mr. Bhagwat Bhade, Police Inspector, Andheri Police Staion, (7) Mr. Shivaji Pavde, then Crime Police Inspector, now at RCF Police Station, Chembur, sent by the Commissioner of the Police to EOW and filed by EOW."

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०८.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(ञ) अन्वये नाकारण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने अपिलार्थींनी दि. २६.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०९.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १३.०१.२०२६ आयोगास सादर करुन नमुद केले की, त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५ च्या अनुषंगाने अति महत्वाच्या अशा निवडणुक बंदोबस्त करता नियुक्त केलेले आहेत. तरी सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात यावी.

५. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १८.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission, Greater Mumbai

16-1-2026

**मुंबई**
**दिनांक : १६.०१.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**